दिनांक :- १७/०५/२००३.

# स्थायी समिती सभा

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक १७/०५/२००३ रोजी सभा सुचना क्र. ०४ दि.   /   /२००३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.४५ वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन म. पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन म. पाटील | सभापती |
| २) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ४) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ५) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ६) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ७) | श्री. वैती चंद्रकांत सिताराम | सदस्य |
| ८) | श्री. तुळशीदास दत्तू म्हात्रे | सदस्य |
| ९) | श्री. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| १०) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| ११) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| १२) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १३) | श्रीम हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर<br>उर्फ<br>पुजा प्रताप शिंदे | सदस्या |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पाटील अशोक बळवंत | सदस्य |
| २) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| ३) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |

**मा. सभापती** :-

सर्व सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानतो व प्र. सचिवांनी कामकाजाला सुरुवात करावी.

**प्रकरण क्र. २१** :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मासळी मार्केट व मटन मार्केटमध्ये बसणाऱ्या विक्रेत्यांकडून भाडे आकारण्यांस मंजूरी देणे.

**दिपक खांबीत** :-

कमिशनर साहेबांची परवानगी घेवुन टॅक्स विभागाकडे प्रकरण पाठवून दिली आहेत. आता त्यांनी कार्यवाही करायची आहे.

**लिओ कोलासो** :-

काय झाले ह्या विषयावर ते तुम्ही आम्हाला सविस्तर सांगा.

**मा. सभापती** :-

आपण विजय पाटील ह्यांना बोलावून घ्या. ते येईपर्यंत पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. २२** :-

मुख्य कार्यालय इमारतीमध्ये वर्ग-१ दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या कक्षात वातानुकूलित यंत्रे बसविणे कामी मंजूरी देणे.

**दिपक खांबीत** :-

टेंडर मागविण्यांत आलेले आहे. ते २३ तारखेला येणार आहे.

**मिलन म्हात्रे** :-

आम्ही सांगितले होते की, तुम्ही आधी कपाटे, खुर्च्या मागवा त्याचे काय झाले.

**संजय गोखले** :-

नविन प्रोसिजर चालू आहे.

**मिलन म्हात्रे** :-

किती खुर्च्या आणि टेबल मागविले आहे.

**संजय गोखले** :-

४० खुर्च्या, १३ कपाटे मागविली. टेबल मागविले नाही. टेबल आणण्याबद्दल सांगितले नव्हते.

**मा. सभापती** :-

तुम्ही टेबल मावून घ्या.

**मिलन म्हात्रे** :-

किती टेबल मागवणार. प्रत्येकासाठी प्रोव्हीजन ठेवा.

**संजय गोखले** :-

टेबल मागविण्यांत येतील व प्रत्येकासाठी प्रोव्हीजन ठेवू.

**धनराज अग्रवाल** :-

मागच्या सभेचे इतिवृत्तांत दिलेले नाही. सभा झाल्यावर तुम्ही दुसरी मिटींग घेता. त्या मिटींगध्ये इतिवृत्तांत द्यायला पाहिजे आणि आता इतिवृत्तांत नाही व आपण त्या सभेचा आढावा घेत आहोत.

**लिओ कोलासो** :-

ज्या सभेचे इतिवृत्तांत देण्यांत येईल त्या सभेचे सम्प्लाई रिपोर्ट घेण्यांत यावा.

**धनराज अग्रवाल** :-

आपल्याला आता जे इतिवृत्तांत दिले आहे त्याचा तुम्ही कम्प्लाई रिपोर्ट घ्या.

**लिओ कोलासो** :-

आज सभा झाली व दुसरी सभा ज्यावेळी लागते त्यावेळी झालेल्या सभेचे इतिवृत्तांत द्यायला पाहिजे.

**प्र. सचिव** :-

साहेब, मिटींग झाल्याबरोबर त्याच दिवशी पुढच्या सभेचा अजेंडा निघतो.

**लिओ कोलासो** :-

गोषवाऱ्या सोबत इतिवृत्तांत देणे शक्य होत नसेल तर सभेच्या दोन दिवस आधी तरी द्यायला पाहिजे.

**माळी (प्र. उपसचिव)** :-

लगेच त्या मिटींगचे इतिवृत्तांत पुढच्या सभेत देणे शक्य होत नाही. दोन मिटिंगनंतर इतिवृत्तांत द्यायचे असते.

**धनराज अग्रवाल** :-

कामात मदत व्हायला पाहिजे. स्टाफ कमी आहे त्याकरिता आपण उपसचिव ह्यांची नेमणूक केलेली आहे. तरी अजून देखील कामात कुठे सुधारणा दिसत नाही. पहिले ज्या पद्धतीने कामकाज चाल होते त्याच रितीने काम चालत आहे असे दिसते.

**महेंद्रसिंग चौहाण** :-

आपण येथे उपसचिव नेमले आहे त्याचे मुख्य कारण ते अनुभवी व्यक्ती आहेत व आपल्या प्रशासनाच्या कामकाजात सुव्यवस्था यायला पाहिजे त्याकरीता आपण त्यांना येथे नेमले आहे. परंतु आम्हाला आता येथे जे इतिवृत्तांत दिले आहे त्याच्यात ठराव आहे त्या ठरावाला अनुक्रमांक देण्यांत आलेला नाही. कामात सुधारणा तर कुठे दिसतच नाही. काय उपयोग आहे मग उपसचिव नेमून. आपण घेतलेल्या निर्णयामध्ये कुठे चुक होत आहे असे दिसून येते. येथे विषयपत्रिकेवर विषयपत्रिकेवर विषय देण्यांत आलेला आहे आणि गोषवारा विषयपत्रिकेबरोबर दिला नाही. तो नंतर देण्यांत आला. कुठल्या गोषवाऱ्यामध्ये शहर अभियंतांचे हस्ताक्षर आहे तर त्याच विभागाच्या गोषवाऱ्यात दुसऱ्या अधिकाऱ्याचे हस्ताक्षर आहे. जर गोषवरा नाही येत तर तो विषय आपण सभेला घेवूच नका.

**धनराज अग्रवाल** :-

विषय आणतांना गोषवारा नसेल तर कृपा करुन आपण तो विषय आणू नका.

**मा. सभापती** :-

ह्याच्यापुढे गोषवारा नसेल तर विषय घेण्यांत येऊ नये.

**ज्योत्स्ना हंसनाळे :-**

आपल्याकडे इतिवृत्तांत गेल्या मिटींगचे नाही आहे तर तुम्ही आढावा कुठला घेत आहात. गेल्या सभेची माहिती ह्या सभेमध्ये यायला पाहिजे. आता आपल्याकडे इतिवृत्तांत ०५/०४/२००३ व १०/०४/२००३ चे आले आहे. आज तारीख काय आहे आणि कुठल्या तारखेचे इतिवृत्तांत देत आहे. ही कुठली पद्धत आहे. गेल्या मिटींगची माहिती पुढच्या मिटींगला यायला पाहिजे.

**लिओ कोलासो :-**

आम्हाला कामाच्या बाबतीत काय झाले त्यांची कम्प्लाई रिपोर्ट पाहिजे व आपल्या कामात अधिका-यांनी लक्ष घालायला पाहिजे व कामात परिवर्तन दिसायला पाहिजे म्हणून हा कम्प्लाई रिपोर्टचा आग्रह धरला आहे.

**ज्योत्स्ना हंसनाळे :-**

महानगरपालिकेत सर्व अधिकारी नविन नविन येताहेत त्यांची माहिती सभेसमोर यायला पाहिजे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

चांगले काम झाले पाहिजे अशी आम्ही प्र. अधिका-यांकडून अपेक्षा करतो. पद्धतशिरपणे काम व्हायला पाहिजे. आपण १०/०४/२००३ चे इतिवृत्तांत आता सादर करता. नंतरचे कधी देणार. आपल्याला असे वाटते की, आम्ही ते फेकून देतो तर नाही. आमच्याकडे देखील त्याची फाईल आहे. आम्ही फायलिंग करतो, ठेवतो व इतिवृत्तांत वाचतोही. अधिका-यांना सांगायला पाहिजे का, कामाची पद्धत काय आहे? कुठला गोषवारा आम्हाला बरोबर देण्यांत आलेला आहे. आज येथे जो विषय आलेला आहे त्या विषयाकरिता ऑडीटर हे येथे उपस्थित पाहिजे. शहर अभियंताने येथे जो गोषवारा दिला आहे तो अभ्यास करुन दिलेला आहे असे दिसत नाही. आपण एखादा विषय आणताना त्या विषयाचा अभ्यास का करुन आणत नाही. आम्ही चागल्या गुडविलमध्ये विषय मंजूर करतो. आपणाला काय असे वाटते की, आम्ही फक्त येथे येतो, बातचित करतो आणि निघून जातो.

**मा. उपायुक्त :-**

शक्य तो पुढच्य मिटींगला इतिवृत्तांत द्यावे असे आहे. दर आठवड्याला स्थायी समितीची सभा असते व महासभेचे देखील कामकाज चालू असते. त्यामुळे इतिवृत्तांत लगेच दुस-या सभेला देणे शक्य होत नाही. त्यामुळे अग्रवाल साहेबांनी सुचविले आहे. त्यावेळचे इतिवृत्तांत देण्यांत येईल त्या मिटींगची कम्प्लाई रिपोर्ट घेण्यांत यावी. ह्याच महापालिकेत असे होते असे नाही. तर दुस-या महापालिकेत देखील दोन मिटींगपूर्वीचे इतिवृत्तांत चालू मिटींगमध्ये मंजूरीसाठी येतात. लगेच इतिवृत्तांत हे तयार होत नाही. कारण अक्षर आणि अक्षर, शब्द हे सर्व व्हेरीफिकेशन करुन द्यावे लागते. त्यामुळे दोन मिटींग नंतर विषयपत्रिकेसोबत इतिवृत्तांत पाठविणे आम्हांला शक्य होईल.

**धनराज अग्रवाल :-**

०५/०४/२००३ ची मिटींग केव्हा झाली. दिड महिना झाला. आपण आम्हांला नक्की तर सांगा.

**मा. सभापती :-**

माळीजी ह्यांना घेण्याचा उद्देश असा आहे की, आधी नगरपालिका होती व आता महानगरपालिका झाली. त्यामुळे कामाबाबत योग्य तो सल्ला मिळाला पाहिजे व काम सुधारले पाहिजे व शहराच्या विकासात बदल होतोय तो बदल नागरिकांना व सदस्यांना जाणवला पाहिजे. आपली येथे नेमणूक सल्लागार म्हणून केली आहे तर कामात कोणतीही त्रुटी दिसणार नाही अशी अपेक्षा आम्ही करतो. जर तुम्हांला स्टाफ नाही, संगणक चालक पाहिजे, शिपाई पाहिजे तसे तुम्ही सांगायला पाहिजे. तशी सुचना तुम्ही आम्हांला केली तर आम्ही त्याप्रमाणे अवलोकन केले असते.

**प्रकरण क्र. २३ :-**

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत सन २००२-०३ या वर्षात करावयाच्या बांधकाम साहित्य पुरवठा कामास मुदतवाढ देणेबाबत निर्णय घेणे.

**दिपक खांबीत :-**

जिल्हाधिका-यांकडून पैसे आले तर काम करायचे आहे. कामाला गेल्या मिटींगमध्ये मुदतवाढ दिली आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

टेंडर केव्हा काढण्यांत आले होते.

**दिपक खांबीत :-**

गेल्या वर्षी काढण्यांत आले होते.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

सिटी इंजिनिअरने कोणत्याही प्रकारचे ऑब्जेक्शन घेतले नाही का?

**<u>दिपक खांबीत</u> :-**

शासनाकडून पैसे आले नाही म्हणून काम थांबले. शासनाकडून जस जशी रक्कम येईल तसे काम करायचे आहे. काम तेच आहे.

**<u>महेंद्रसिंग चौहाण</u> :-**

हे काम कॅन्सल करायला पाहिजे. मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ मध्ये कोणत्याही पद्धतीने मुदतवाढ करण्याचा अधिकार नाही असे आहे म्हणून मुदतवाढीचा ठराव हा कॅन्सल करायला पाहिजे.

**<u>दिपक खांबीत</u> :-**

हे काम वेगळे आहे.

**<u>महेंद्रसिंग चौहाण</u> :-**

ह्या कामातून आपल्याला पैसे येणार आहेत का?

**<u>धनराज अग्रवाल</u> :-**

आठ ते नऊ विषय मुदतवाढीचे आणले होते. आपण त्या वेळेला ऑब्जेक्शन घेतले होते. आपण मुदतवाढीचे विषय एकत्र कशाला आणता.

**<u>लिओ कोलासो</u> :-**

अंतर्गत लेखापरिक्षक त्यावेळेला सभेत हजर होते. त्यांनी मुदतवाढीच्या विषयावर हस्तक्षेप करायला पाहिजे होते. आम्हांला विषय पास करायला लावले आणि कायद्याच्या कचाट्यात अडकवायला पाहिले आहे. आमच्या पाठीत खंजीर मारला आहे. आम्हांला अंधारात ठेवले अशा पद्धतीचे कामकाज चालणर नाही.

**<u>धनराज अग्रवाल</u> :-**

मिरा भाईंदर नगरपालिका ही पहिल्यापासून खूप बदनाम आहे - भ्रष्टाचाराबाबत. आणि अधिकारी हे असे आमची दिशाभूल करताहेत. काही गैरवर्तन घडले की, ते नगरसेवकांनी पैसे घेतले असे बोलले जाते. विषय येतात ते सचिवांकडूनच घेतले जातात. अभियंताला विषय घेतांना विचारले नाही का?

**<u>मा. सभापती</u> :-**

एका वर्षाकरिता मुदतवाढ झाली होती. मुदतवाढ दिली तेव्हा तुमचा कोणता आक्षेप आलेला नाही. अशा पद्धतीची निविदा आल्यानंतर त्यावेळी तुम्ही अस कधी सांगितले नाही किंवा बोलले नाही. त्याच्यावर कार्यवाही होणे योग्य आहे का तर यथायोग्य आहे.

**<u>महेंद्रसिंग चौहाण</u> :-**

३०० नंबर कुठला आहे. मुदतवाढ केव्हा दिली. ठराव काढा आणि दाखवा आम्हाला ज्या अधिकाऱ्याबरोबर हा विषय संबंधित आहे त्या अधिकाऱ्याला बोलवा.

**<u>मा. सभापती</u> :-**

सचिवजी या ठरावाची माहिती मागवा आपण.

**<u>महेंद्रसिंग चौहाण</u> :-**

ज्यांना ह्या गोष्टीची माहिती आहे त्यांनी कसे काय विषय मंजूर करायला दिले. लेखा परिक्षकरांच्या संमतीने आपण पेमेन्ट करता ना.

**<u>मा. सभापती</u> :-**

त्यावेळेला लेखा परिक्षक हे उपस्थित होते. तेव्हा त्यांनी सांगायला पाहिजे होते, असे काम होणार नाही.

**<u>लिओ कोलासो</u> :-**

चुकीची माहिती सभागृहाला दिलेली आहे. त्याला खात्याचे अधिकारी जबाबदार आहेत व आम्ही त्याबाबत हा विषय आमसभेसमोर मांडणार आहोत. आपण आम्हांला गोषवारा आणून दाखवा. आम्हांला तसा ठराव करायचा आहे.

**(प्रभारी सचिवांनी प्रकरण क्र. ३७ चे वाचन केले)**

**<u>लिओ कोलासो</u> :-**

ठराव दिले आहेत त्या ठरावांना क्रमांक देण्यांत आलेले नाही.

**<u>मिलन म्हात्रे</u> :-**

पान क्र. ५ वर नगरभवनला गेल्या वर्षापासून मोटर बसवून घेतले त्यामुळे तेथे पाणी व्यवस्थित यायला लागले आहे. तर यायला ह्या शब्दाऐवजी मिळायला लागले आहे असे मी बोललो आहे. पान

क्र. ६ वर डी.पी. डेव्हलप करतांना झाडे तोडण्यांत आली होती तर त्याऐवजी डी.पी. रोड डेव्हलप करतांना रोड वायंडिंग करतांना काही झाडे तोडण्यांत आली होती असे सुधारित करण्यांत यावे.

**धनराज अग्रवाल :-**

पान क्र. ६ वर सभापती साहेब आपण रुलिंग दिली आहे. याबाबतचा अहवाल सादर करुन पुढच्या सभेला विषय घेण्यांत यावा. तर त्या रुलिंगवर काय कार्यवाही झाली आहे.

**गोविंद परब :-**

टेंडर मागविले आहे.

**प्र. सचिव :-**

निविदा काढण्यांत आलेली आहे.

**धनराज अग्रवाल :-**

प्रत्येक प्रभागाला किती पिंजरे देणार आहात.

**गोविंद परब :-**

पन्नास पिंजरे द्यायचे असे सभेत ठरले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. ७ वर संरक्षक भिंत पडली आहे. तर ती पेणकर पाड्याचा जो तलाव आहे त्याची भिंत कोसळली होती. याबाबत पत्र आणि फोटो दिलेला आहे.

**चंद्रकांत वैती :-**

पान क्र. ८ वर प्रश्न विचारण्यांत आला होता, सभापती साहेब की, जे शिक्षण अधिकारी आहेत त्यांचे काय झाले. कमिशनर साहेबांनी महासभेत उत्तर दिले की, त्यांना ॲन्टी करप्शन वाल्यांनी पकडले आहे व त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यांत आलेला आहे. त्या जागेवर लवकरच दुसरे अधिकारी येणार आहेत. तर ते अधिकारी आले आहेत का? आणि सुर्यवंशी बरोबर कुणा कुणाचा चार्ज होता.

**प्र. सचिव :-**

शिक्षण अधिकारी सन्याशु हे आले आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

आपण त्यांना सभागृहात बोलवायला पाहिजे.

**लिओ कोलासो :-**

आता जून महिना जवळ आला आहे आणि शाळा आता चालू होणार आहेत. ते सर्व आपल्याला बघायला पाहिजे. ते कोण बघणार आहे. शाळांची दुरुस्ती, त्यांचे नवीन वर्ग वगैरे सर्व बघायला पाहिजे. बंदरवाडीच्या शाळेची तक्रार होती त्याचे काय?

**चंद्रकांत वैती :-**

योग्य ती माहिती घेऊन त्या गाड्या ताबडतोब तेथून काढाव्या व त्यांना दुसरीकडे जागा द्यावी.

**धनराज अग्रवाल :-**

पान क्र. १० वर पुढच्या सभेत माहिती घेण्यांत यावी असे सांगितले.

**मा. सभापती :-**

माहिती नव्हती म्हणून पुढच्या सभेत विषय घ्यायला सांगितले आहे.

**लिओ कोलासो :-**

पान क्र. १७ वर शिवप्रकाश भुदेकाजींचे भाष्य आहे. त्यांनी सांगितले होते की, मिरा रोडच्या रस्त्यावर वीस कनेक्शन इनलिगल आहे. त्या विषयावर काय कार्यवाही झाली. तो विषय सोडून दिला का? ते नांव देणार होते त्याचे काय झाले?

**मिलन म्हात्रे :-**

ह्या विषयावर आपल्या प्रशासनाने काय कार्यवाही केली.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. उपायुक्त साहेब भुदेकांजींना लोकप्रतिनिधी या दृष्टीने प्रश्न मांडला व वीस कनेक्शन इलिगल आहे असे त्यांनी ठामपणे सांगितले आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

असे ते बोलले असतील तर त्याच्यामागे काहीतरी अर्थ असेल ना. तर त्यांनी सरळ सरळ नांव हे सांगायला पाहिजे.

**चंद्रकांत वैती :-**

खात्यामार्फत चौकशी करण्यांत आली आहे का? मला ठाम विश्वास आहे की, मिरा रोड येथे असे इलिगल कनेक्शन नाही. म्हणून मी स्वतः सांगितले होते आपण ह्या विषयावर चौकशी करा आणि असे इलिगल कनेक्शन आढळल्यास त्यावर फौजदारी गुन्हा नोंदवा.

**लिओ कोलासो :-**

दशोरेजी हे अत्यंत अभ्यासू, कामसू व्यक्ती आहे. मी त्यांचा सन्मान करतो. पण ह्या ज्या गोष्टी आहेत त्याकडे आपण लक्ष दिले पाहिजे व जास्तीत जास्त प्रशासकीय कामकाजात सुधारणा आणायला पाहिजे. शहरात कुणी ही असे मोठी नावाजलेली व्यक्ती असो किंवा बिल्डर असो त्यांत आपला सहभाग हा असा पॉझिटीव्ह असता कामा नये. आपण ह्या विषयावर व्यवस्थित कार्यवाही करा व आम्हांला योग्य ती माहिती द्या.

**धनराज अग्रवाल :-**

कनेक्शन रेग्युलाईज केले आहे त्याचे बिल पाठविले आहे.

**दशोरे (पा.पू.) :-**

इलिगल कनेक्शन रेग्यूलाईज केले आहे. त्यांना आपण बिल पाठवणर आहोत. नविन रजिस्टर सात आठ दिवसांत येणार आहे व बिल पाठवणर आहोत. पुढच्या पंधरा दिवसात कार्यवाही केली.

**लिओ कोलासो :-**

आपण येथे खात्याच्या अधिका-यांने बोलायला पाहिजे अशा प्रकारचे एकपण कनेक्शन दिलेले नाही.

**दशोरे :-**

जर कुठे असे कनेक्शन असेल तर आपण आम्हांला दाखवा आम्ही लगेच गुन्हा दाखल करु.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य स्थायी हे जबाबदार सदस्य आहेत व त्यांच्या निदर्शनास आलेली ही बाब गंभीर आहे. त्यांनी मांडलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले पाहिजे व माहिती द्यायला पाहिजे. हे सदस्य स्थायीचे सदस्य आहे आणि त्यांनी जाणिवपूर्वक ही माहिती दिलेली आहे. सदस्यांनी सांगितल्यावर तुम्ही त्याबाबत अभ्यास केला पाहिजे व तुम्ही अहवाल सादर केला पाहिजे. प्लंबरला बोलावून विचारणा केली आहे का आपण. ही कनेक्शन लिगल आहेत किंवा नाही त्याबाबत चौकशी व्हायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या सभेमध्ये २० कनेक्शन इलिगल घेतले आहे. त्याबाबत बोलले जात आहे. आपण याबाबत अधिका-यांकडून क्लेरिफिकेशन मागतो ते का? आपले महापालिकेच्या वतीने देखील कर्तव्य आहे. आपण त्याबाबत लेखी पत्र द्या. अन्यथा तुम्हाला असे कनेक्शन आढळल्यास तुम्ही स्वतः त्या अधिका-याला जाऊन सांगा व ते कनेक्शन कापून घ्या. मी देखील स्वतः असे काम केले आहे. उगाच प्रशासनाचा वेळ कशाला घेता आपण. ही मिटींग संपल्यानंतर तुम्ही अधिका-यांना घेऊन जा आणि ते कनेक्शन दाखवा आणि कापून घ्या. भुदेकाजींनी एलिगेशन केले तुम्ही सांगा व अग्रवाल साहेब बोलेले ना तुम्ही असे इलिगल कनेक्शन नाही म्हणून सांगा. मग आम्ही दाखवितो आपल्याला असे कनेक्शन कुठे आहे. म्हणजे त्यांना माहिती आहे.

**धनराज अग्रवाल :-**

मी सांगतो असे बोललो नाही. भुदेकाजींना माहित आहे असे सांगितले आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपण प्रश्न विचारल्यानंतर अधिका-यांचे काय काम आहे. त्या अधिका-यांचे कर्तव्य काय आहे ह्या ठिकाणी चोरी झाली आहे तर त्याबाबत त्यांनी चौकशी करायला पाहिजे.

**मा. उपायुक्त :-**

चौकशी करण्यांत येईल.

**लिओ कोलासो :-**

पाणी पुरवठ्याचे अधिकारी कोण आहेत. त्यांनी तिथे जाऊन चौकशी करायला पाहिजे. त्यांनी चौकशी केली नाही तर तुम्ही त्यांच्यावर कार्यवाही करा.

**मा. सभापती :-**

उपायुक्त साहेब ही गंभीर बाब आहे. एखादा सदस्य सांगतो ठामपणे की, इलिगल कनेक्शन आहे. पाहिजे तर आम्ही दाखवितो तर त्या अधिका-याने कसे काम केले पाहिजे.

**लिओ कोलासो** :-

भुदेकाजी आम्ही आपण मांडलेल्या प्रस्तावाचे समर्थन करतोय. ठिक आहे. आपल्याला माहिती आहे तर ती नावे आपण सांगा.

**शिवप्रकाश भुदेका** :-

नांव असं सांगायला बरोबर वाटत नाही.

**चंद्रकांत वैती** :-

जर तुम्ही सभागृहात सर्वांसमोर माहिती सांगत नसाल तर त्या खात्याच्या अधिका-यांकडे जाऊन ती माहिती घ्यावी.

**मा. सभापती** :-

आपले अधिकारी कार्यक्षम आहेत. त्यांनी माहिती सभागृहाला द्यायला पाहिजे.

**दशोरे** :-

प्रशासनाकडून डे-टू-डे प्रत्येक वेळी कार्यवाही केली जाते. पण असे काय झाले असेल तर आम्ही त्याची लवकरात लवकर तपासणी करु.

**तुळशीदास म्हात्रे** :-

जूनी बिल्डींग आहे त्यांना तुम्ही कनेक्शन देत नाही आणि नविन बिल्डींगला असे इलिगल कनेक्शन दिले जाते. ते बिल्डींगवाले आम्हांला विचारतात त्यावेळी आम्ही त्यांना काय उत्तर द्यायचे.

**मा. उपायुक्त** :-

पुढच्या मिटींगला आम्ही तपासणी करुन सांगतो की, किती इलिगल कनेक्शन आहेत आणि कोणत्या बिल्डींगला कायम स्वरुपी कनेक्शन देणार नाही.

**मिलन म्हात्रे** :-

आपण जे वीस कनेक्शनबद्दल चौकशी करण्यासाठी अधिका-यांना आदेश दिलेले आहेत त्याबाबत सन्मा. सदस्यांकडे त्यांची देखील लेखी पत्राची मागणी करा. तो लेखी पुरावा राहील. तुम्ही त्यांच्याकडे लेखी माहिती घ्या कारण २० चे २२ होऊ शकतात किंवा १५ चे १७ देखील होऊ शकते. तुम्हांला देखील काम करायला सोपे जाईल आणि जी आपणाला माहिती मिळेल ती माहिती गोपनीय ठेवा.

**धनराज अग्रवाल** :-

लेखी माहिती मागविली आणि तुम्ही कनेक्शन कापायला गेलात व भुदेकाजींच्या घरी मोर्चा आला तर त्याचे काय करायचे. लोकांना उत्तर तर लोकप्रतिनिधींनी द्यायचे आहे ना. आपल्या अधिका-याचे काम काय? कोणते कनेक्शन इलिगल आहे, लिगल आहे ती चौकशी त्यांनी करायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे** :-

नगरसेवकांचे काम आहे की, जे काय त्यांनी बोलले आहे ते दाखवून देणे.

**धनराज अग्रवाल** :-

इलिगल कनेक्शन बद्दल बोलतोय. जर त्या अधिका-यांना इलिगल कनेक्शन नाही मिळाले तर आम्ही ते कनेक्शन दाखवू.

**मा. उपायुक्त** :-

त्या नगरसेवकांकडून माहिती घेऊ आणि आम्ही पण तिथे जाऊन माहिती घेऊ व जे इलिगल कनेक्शन आहे ते कापू.

**तुळशीदास म्हात्रे** :-

आता जे ह्याच्यासाठी बोलले नसतील कारण तिथे कनेक्शन तोडायला गेल्यावर अधिकारीच सांगातात की, ह्या ह्या नगरसेवकांनी तक्रार केली आहे. अधिकारी जर अशा प्रकारे वागत असतील तर आम्ही काय करायचे. आम्ही आपल्याला माहिती दिल्यावर आपण आमचे नांव तिथे जाऊन सांगतात. तुम्ही अधिकारी काय काम करतात ते साईटवर जात नाही का? मी मध्ये नाल्यावर जे काम केले गेले त्या संदर्भात सांगितले होते की, ते इलिगल काम आहे. आपले अधिकारी जेव्हा तिथे गेले त्यावेळी त्यांनी माझे नांव सांगितले की, ह्या नगरसेवकांनी तक्रार केली आहे.

**चंद्रकांत वैती** :-

ह्या विषयावर गंभीरतेने आपण लक्ष द्यायला पाहिजे. ह्या अशा अधिका-यांच्या वागणुकीमुळे नगरसेवकांवर आरोप केला जातो व आपल्या महानगरपालिकेचे नांव बदनाम होते. काही अधिकारी नगरसेवकांच्या बद्दल गैर बोलले जाते. ही गंभीर बाब आहे. जर काम व्यवस्थित होत नसेल तर संबंधित अधिका-यांची जागा बदलून द्या व त्याजागी सक्षम अधिकारी मागवा.

**मा. सभापती** :-

वैती साहेबांनी सांगितले आहे जर एखाद्या सन्मा. सदस्यांना अधिकारी जर असे बोलत असेल तर ते निदर्शनास आणून द्या व जे अधिकारी असे बोलतात त्यांचे आपण नांव सांगणे.

**चंद्रकांत वैती :-**

ह्याची इतिवृत्तांत नोंद झाली पाहिजे म्हणून मी सभागृहात बोलत आहे. महासभा येत आहे त्यात देखील मी ह्याबद्दल वक्तव्य करणार आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

आपण मला सांगता नांव सांगा म्हणून तर आपण देखील नांव सांगा ना. कोण अधिकारी असे बोलतात.

**चंद्रकांत वैती :-**

नांव सांगेन पण मी हा विषय महासभेत घेणार आहे.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. तुळशीदास म्हात्रे हे जेष्ठ व जागरुक नागरिक आहेत आणि त्यांनी केलेली तक्रार ही गंभीर बाब आहे. सरकारी नाल्यावर बांधकाम झाले आहे आणि त्यांनी त्यांची तक्रार केलेली व अधिकारी जेव्हा तोडायला गेले व त्यांनी त्यांचे नांव घेतले ही फार गंभीर बाब आहे. आपण त्या अधिका-यावर ॲक्शन घ्यावी.

**मा. उपायुक्त :-**

जे बेकायदेशीर बांधकाम आणि अतिक्रमण आहे ते सुरुवातीला तोडायला सुरुवात केली होती. आता दोन बांधकामे उभी राहीली होती ती आम्ही पहिल्यांदा तोडली होती. सर्वे नंबर ७८ ते १५ गोल्डन नेस्टच्या पाठीमागे व गोडदेव नाक्याच्या पाठीमागे आता जी चार दिवसाची सुट्टी त्या सुट्टीमध्ये काम केले. त्या ठिकाणी देखील सी.सी. होती. त्यावेळी ते काम लिगल आहे का इलिगल आहे ते समजू शकले नाही. धनेगावे साहेबांनी जेव्हा त्याचा नकाशा बघितले तेव्हा समजे की ते बांधकाम हे परवानगीपेक्षा जास्त बांधले आहे असे निदर्शनास दिसून आले.

**लिओ कोलासो :-**

आर्किटेक्टला आपण ब्लॅक लिस्टमध्ये टाकता का? सी.सी. त्या जागेची दिली आणि जास्त बांधकाम केले आहे तर तो आर्किटेक्ट त्याला जबाबदार आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

त्याचे काम तोडले का?

**मा. उपायुक्त :-**

बेकायदेशीर बांधकामावर कंट्रोल नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मी कुठे बोलतो कंट्रोल नाही असे. आपल्या पलिकेचे अधिकारी त्यांना आश्वासन देतात आणि तो कर्ज घेऊन बांधतात आणि नंतर बेकायदेशीर आहे असे समजते व ते तोडले जाते. हे बरोबर आहे का?

**मा. सभापती :-**

त्याचे ॲफिडेव्हीट घ्या ना तुम्ही.

**धनराज अग्रवाल :-**

आर्किटेक्ट कशाला पास करतो. जो कोणी आर्किटेक्ट आहे तो चुकीची मंजूरी देतो त्याच्यावर तुम्ही ॲक्शन घ्यायला पाहिजे.

**लिओ कोलासो :-**

त्या आर्किटेक्टचे नांव सांगा. धनेगावे, तो आर्किटेक्ट कोण होता.

**धनेगावे :-**

राठोड.

**लिओ कोलासो :-**

त्याचे नांव तुम्ही ब्लॅक लिस्टमध्ये टाका.

**मा. सभापती :-**

क्षेत्रिय अधिका-याचे काम काय आहे. त्या भागामध्ये काय कामकाज चालू आहे ते तुम्हांला नगरसेवकांनी सांगायला पाहिजे. त्या क्षेत्रीय अधिका-याला नोटीस देण्यांत यावी.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या अगोदर महासभेत मा. उपमहापौरांनी रुलिंग दिली होती. तर त्याचे अवलोकन करण्यांत आले आहे का? त्याची इतिवृत्तांताला नोंद आहे ते लक्षात ठेवा आणि हे दुसरे प्रकरण आले आहे.

**मा. सभापती :-**

त्याचा आपण तपास करुन घेऊ. त्या त्या विभागातील क्षेत्रीय अधिकारी जेव्हा पासून कार्यरत आहेत तेव्हापासून त्यांनी किती अतिक्रमणे काढली, कितींना नोटीसा दिल्या आहे. अशा प्रकारचा अहवाल मागवून घेतला आहे. केसरीनाथ म्हात्रे ह्यांची कामाची पद्धत काय आहे. आम्ही कामाच्या पद्धतीची माहिती मागितली आहेत क्षेत्रीय अधिका-यांकडून. अतिक्रमणाचे काम चालू आहे. डाव्या बाजूला व उजव्या बाजूला किती अतिक्रमणे तोडली त्याची माहिती क्षेत्रीय अधिका-याला पाहिजे. जर माहिती नाही तर माझ्यामते काहीतरी लपवायचे आहे असेच झाले ना. केसरीनाथ म्हात्रे आपण सक्षम अधिकारी आहात. आपण जातीने लक्ष द्यायला पाहिजे.

**लिओ कोलासो :-**

तुळशीदास म्हात्रे साहेब सांगतात त्यांच्या घराच्या पाठीमागे बांधकाम चालू आहे. तर त्यांना तुम्ही निलंबित करा. कारण ते बोलले ना मी पुरव्यासहित बोलतो, असेच बोलत नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

नविन ७४ सर्वे नं. १०. दुसरा नंबर देऊ का?

**मिलन म्हात्रे :-**

हायवेच्या बाजूला अतिक्रमण पाडले त्याची काय माहिती आली आहे का? स्थगिती वगैरे काय आली आहे काय? तिथे अतिक्रमण तोडले त्या जागी एका बाजूची भिंत अशी पूर्ण उभी आहे. अंबामाता इंडस्ट्रीयल मध्ये अशीच शेड पडली आणि अपघात झाला आहे. त्यामुळे तुम्ही तिथे लक्ष द्या.

**मा. उपायुक्त :-**

जे.सी.बी. लावून जर भिंत ढकलली तर त्या ठिकाणी राहणारे लोकांचे नुकसान होईल त्यारिता ती भिंत ते स्वतः तोडून घेणार आहेत.

**प्रकरण क्र. ३७ :-**

दि. ०५/०४/२००३ व दि. १०/०४/२००३ रोजीचे स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. :-**

दि. ०५/०४/२००३ व दि. १०/०४/२००३ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :-** **अनुमोदन :-**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३८ चे वाचन केले.)**

**धनराज अग्रवाल :-**

लोकप्रतिनिधींच्या संख्येनुसार कॅबिन बनविण्यांत येणार आहे का? कारण ठाणे महानगरपालिकेत अशी पद्धत आहे की जो पक्ष मोठा आहे त्याला मोठे कॅबिन. ज्या पक्षात कमी संख्या आहे त्याला लहान कॅबिन.

**मा. उपायुक्त :-**

दहा टक्केपेक्षा टोटल कमी असेल त्यांना दिलेलेच नाही. हा महासभेने निर्णय घ्यायचा आहे.

**धनराज अग्रवाल :-**

पण हा विषय आपल्याकडे आला आहे ना मंजूरीसाठी.

**लिओ कोलासो :-**

मागे एका सभेमध्ये डी.एम.सी. साहेबांनी काहीतरी रुलिंग दिली आहे नियमाबद्दल आणि पॅचवर्कचा विषय घेतला आणि त्याला बांध घातला आहे. आता प्रश्न असा आला आहे. ह्याच्याबद्दल अंतर्गत लेखा परीक्षकानं सुस्पष्ट सांगितले पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

कॅबिन घेणे हा आमचा हक्क आहे आणि ते घेतल्याशिवाय आम्ही विषय सोडणार नाही. डी.एम.सी. आले आणि आपण आपल्या गाड्या दिल्या ते कुठल्या कायद्यामध्ये तरतुद आहे. नॅशनल पार्टीचे सिम्बॉल आहे. हा प्रश्न गौण आहे. अपक्ष म्हणून महापौर वेगळे आहेत. काही महानगरपालिकेत हा जो प्रश्न आहे तो महत्वाचा आहे. तो कुणाच्या हट्टापायी पडून राहिला तर तो आम्हांला तडीस नेता येतो. हे बघा तुम्ही अनेक वेळा हा विषय घेण्याचा फेटाळला आहे. सर्व राजकीय पक्षांना कॅबीन हे देण्यांत आलेले आहे. तुम्ही स्थायी समितीमध्ये अनेक वादग्रस्त विषय मंजूर करताहेत तुम्ही. आमची ह्या महानगरपालिकेत सर्वसाधारणपणे बसण्याची व्यवस्था झाली पाहीजे आणि आम्ही ते घेतल्याशिवाय राहणार नाही. हा ठराव आपण मंजूर करावा अशी विनंती आहे. आपण जो ठराव आणला आहे तो इतर सर्व रेशो घेता सगळीकडे आहे. आम्ही काय नव्याने मागतो असे नाही आहे. मागच्या वेळेला ॲसेसरी आयटम तुम्ही मंजूर केले आहे.

**लिओ कोलासो** :-

त्याच्यावर अगोदरच्या सभेमध्ये ओपिनियन आले होते का?

**मा. उपायुक्त** :-

स्थायी समितीनेच निर्णय घ्यायचा आहे. कुणाला द्यावे व कुणाला देऊ नये असे.

**मिलन म्हात्रे** :-

मागच्या वेळेला वाहने मागवा असे आले होते तर तो विषय आपण कसा घेतला. वाहने घ्यायची नाही अशी तरतुद आहे. तसा जी.आर. आहे माझ्याकडे.

**लिओ कोलासो** :-

पॅच वर्कचा काम दिले आहे. तसे पुन्हा ऑडीटर आक्षेप घेणार का ह्या विषयावर.

**मिलन म्हात्रे** :-

ए.सी.चा देखील जी.आर. आहे. मग तुम्ही ए.सी.चा विषय कसा मंजूर केला.

**लिओ कोलासो** :-

जी.आर. आहे हे स्पष्ट आहे. तर आपण कशाला मागवतो. जी.आर.चा काय उपयोग.

**धनराज अग्रवाल** :-

आम्ही त्या विषयावर बोललो होतो की, कशाला ए.सी. मागवता.

**चंद्रकांत वैती** :-

वर्ग १ चे अधिकारी आहेत त्यांना ए.सी. देण्यांत यावे असे सभापती साहेबांनी सर्व सदस्यांना विनंती केली होती.

**शिवप्रकाश भुदेका** :-

कायद्याचे पालन करावे लागणार आहे.

**धनराज अग्रवाल** :-

कॅबीन संख्येच्या आधारावर बांधा व कॅबिन बांधणार तर आमच्यासाठी त्याच्यात फॅसिलीटी काय आहे.

**मिलन म्हात्रे** :-

कॅबीनमध्ये किमान पक्षी काही माणसे बसू शकतील अशी तुम्ही प्रोव्हीजन करा.

**मा. उपायुक्त** :-

ह्या सर्व गोष्टींचा विचार करुन काम करण्यांत यावे.

**लिओ कोलासो** :-

विरोधी पक्ष व सर्व राजकीय पक्षांना आपण कॅबिन कुठे देणार आहात.

**मिलन म्हात्रे** :-

पहिल्या माळ्यावर कॅबिन देण्यांत यावे. जेणेकरुन सगळ्यांना सोयीस्कर पडेल असे महापौरांच्या दालनात त्यांनी आयुक्तांना सांगितले आहे.

**मा. उपायुक्त** :-

आपण जे सांगितले आहे तसे नियोजन प्लॅन आम्ही मंजूर केले आहे.

**मा. सभापती** :-

आपण आधी सर्व ठरवून हा विषय सभागृहात आणला आहे. तर ह्या विषयाला एवढी चर्चा करण्याची गरज काय होती आणि विषय मंजूर होण्याच्या अगोदर नियोजन प्लॅन तयार करण्यांत आले ते कसे काय.

**ज्योत्स्ना हसनाळे** :-

तुम्ही जागा बघितली जागा पाहणी केली आणि मग कशाला हा विषय खेचता आपण.

**मा. सभापती** :-

पहिल्या माळ्यावर जागा देण्याचे सांगितले जाते. पण तिथे जागा आहे का? अजून तुमच्या खात्याचे अधिकारी यायचे आहे. त्यांना देखील बसायला जागा उपलब्ध नाही. ग्राऊंड फ्लोअरला जागा आहे त्या ठिकाणी जर कॅबिन बांधण्यांत आले तर चांगले होईल. कारण समजा संध्याकाळी उशिर झाला तरी देखील आम्ही उशिरा पर्यंत आमच्या कक्षात बसु शकतो व कामकाज करु शकतो. प्रशासनाला कोणताही त्रास न देता.

**लिओ कोलासो :-**

हे बरोबर बोलतात. हे वस्तुनिष्ठ आहे.

**मा. सभापती :-**

ग्राऊंड फ्लोअर वर कॅन्टीन आहे. त्याच्या बाजूला पत्रकार कक्ष आहे. तिथे जी बाजूला जागा आहे तिथे कॅबीन बांधण्यांत यावे.

**मा. उपायुक्त :-**

जागा सुचवून तुम्ही ह्या विषयाला मंजूरी द्या.

**दिपक खांबीत :-**

कॅबीनमध्ये एक टेबल, दहा खुर्च्या व पार्टीशन एवढी सोय करण्यांत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

कपाट देखील आम्हाला देण्यांत यावे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

कॅबिन पार्टी वाईज करा.

**धनराज अग्रवाल :-**

आमचे सोळा सदस्य आहेत तर सोळा सदस्य कॅबिनमध्ये बसले पाहिजे अशी व्यवस्था पाहिजे.

**मा.उपायुक्त :-**

हा विषय पार्टीवाईज पक्षांना कॅबिन देण्याचा आहे. आपले जर जास्त सदस्य असतील तर ते सगळेच्या सगळे एकत्र येऊन कॅबिनमध्ये बसणार नाही. आपल्याला कॅबिन देण्यात येत आहे कारण आपल्या विभागाच्या जनतेचे जे काय प्रश्न असतील ते आपल्याकडे येऊन मांडू शकतील. आपले कॅबिन ज्यामापाप्रमाणे असतील त्याप्रमाणेच आम्ही देऊ.

**लिओ कोलासो :-**

सत्ताधारी पक्ष हे मेजर पक्ष ठरले पाहिजे.

**मा.उपायुक्त :-**

सभासद संख्येने कॅबिन बांधले तर जागा शिल्लक राहणार नाही. कमीत कमी संख्या ठरवा.

**प्रकरण क्र.३८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सर्व पक्षाचे गटनेते व नगरसेवक यांना पक्षानुसार कार्यालयीन कॅबिन तयार करून देणे तसेच पाणी पुरवठा विभाग व अधिका-यांकरिता कॅबिन तयार करणे कामी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देणे.

**ठराव क्र. ______ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत खालील पक्षाचे गटनेते व सदस्य आहेत.

१) राष्ट्रवादी काँग्रेस
२) कॉग्रेस (आय)
३) भारतीय जनता पार्टी
४) शिवसेना
५) शहर विकास आघाडी मिरा भाईंदर
६) जनता दल (सेक्यूलर)

वरील सहा पक्षाच्या गटनेते व नगसेवकांना कामाकाजाकरिता पहिल्या माळयावर कॅबिन न करता तळमजल्यावर पत्रकार कक्षासमोर (कॅन्टीग शेजारी ) कॅबीन करण्यात याव्यात सदर तळमजल्यावर प्रत्येक पक्षाच्या सदस्य संख्येनुसार कॅबिनच्या साईज ठेवण्यात याव्यात.

सदर कामी सहा पक्षाचे गटनेते व पहिल्या मजल्यावर पाणी पुरवठा व आरोग्य विभागा करिता कॅबिन तयार करण्यास येणा-या रुपये ७ लक्ष एवढया खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :-** **अनुमोदन :-**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र.सचिवांनी प्रकरण क्र.३९ चे वाचन केले.)

**<u>दिनेश नलावडे</u> :-**

मा.उपायुक्त साहेब भाईंदर पूर्व चौपाटी विकसीत करणेबाबतचा विषय आहे. साहेब जी स्ट्रीट लाईट लागली आहे तो प्रस्ताव पास करून घेतला आहे का? स्थायी समिती समोर विषय मंजूरीला आला होता का? हा खर्च आहे तो खर्च तिथे कशाला करण्यात आला, तिथे स्ट्रीट लाईटची काय गरज आहे का? आम्ही तिथले नगरसेवक असताना देखील आम्हाला माहिती मिळत नाही. कोणाला तिथे कामावर ठेवले आहे. आम्हाला हयाचा खुलासा करून दया.

**<u>दिपक खांबीत</u> :-**

सदर चौपाटीवर केंद्रीय मंत्री राम नाईक साहेब येणार होते. त्यामुळे स्ट्रीट लाईटचा प्रस्ताव हा बी.एस.ई.एस.कडे पाठवला आहे.

**<u>दिनेश नलावडे</u> :-**

महासभा किंवा स्थायी समितीमध्ये ठराव घेतला नाही. त्याठिकाणी स्ट्रीट लाईट हे दिवसादेखील चालू असतात व आज त्याचा भरणा महानगरपालिका करते आणि ती स्ट्रीट लाईट अशाठिकाणी लागली आहे तिथे कसल्याही प्रकारचा उपयोग होत नाही. सगळया सदस्यांनी जावून पाहणी केली आहे. प्रत्यक्षसाहेब तुम्ही देखील होता. हयाचा खर्च पब्लिकवर पडतो. आज जी लाईट चालू आहे तिथे एकही नागरिक नसतो आणि काम महानगरपालिका करते व बोर्ड वेगळया पक्षाचे लावले जाते. हयावर आपण निर्णय घ्या.

**<u>लिओ कोलासो</u> :-**

स्ट्रीट लाईट रेग्युलर प्रोग्राममध्ये मंजूर झालेले नाही.

**<u>मा.सभापती</u> :-**

असा खर्च करता येतो का म्हणून जिल्हाधिका-यांकडे प्रस्ताव पाठविला आहे आणि त्याचा भरणा महानगरपालिकेला करावा लागतो. विषय असा आहे जर ती महानगरपालिकेच्या ताब्यात आहे किंवा नाही आणि ती जागा ताब्यात नसताना खर्च मिरा भाईंदर महानगरपालिका करू शकते हयाचे आपण पहिल्यांदा उत्तर दया.

**<u>दिनेश नलावडे</u> :-**

एखादया नगरसेवकाचा प्रस्ताव येतो आणि काम होते हे बरोबर नाही.

**<u>मा. उपायुक्त</u> :-**

ती जागा रिझरव्हेशमध्ये आहे. जागा ताब्यात येणार असल्यामुळे तिथे लाईट लावली ते योग्य आहे. त्यावेळेला आम्ही जागा रिझरव्हेशमध्ये आहे म्हणून कलेक्टर साहेबांची मंजूरी घेऊन काम केले. ते बरोबर आहे का चूक आहे आणि जागा ताब्यात मिळणार म्हणून खर्च केला तर तो खर्च अयोग्य आहे असे नाही.

**<u>शिवप्रकाश भुदेका</u> :-**

चौपाटीवर दाखवायला राम नाईक साहेबांना घेऊन गेले त्यावेळी त्यांनी चौपाटीच्या कामासाठी एक करोड देण्याचे घोषित केले आहे व त्यांनी सांगितले आपले चौपाटीबाबतचा प्लॅन बनवून द्या मी आपले काम करतो.

**<u>दिपक खांबीत</u> :-**

नगरसेवक रोहिदास पाटील ह्यांचे ह्याबाबत लिखीत पत्र आहे.

**<u>महेंद्रसिंग चौहाण</u> :-**

प्रस्ताव कोणत्या तारखेला पाठविले आहे.

**<u>धनेगावे</u> :-**

१५/१२/२००१ रोजी पाठविले आहे.

**<u>महेंद्रसिंग चौहाण</u> :-**

ह्या प्रस्तावावर एंन्टीमेशन द्या. ह्या प्रस्तावावर प्रेझेन्ट काय केले आहे.

**दिपक खांबित :-**

प्रेझेन्टेशन यायचे आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

कृपया २४ तासाच्या आत आपण त्या ठिकाणी लागलेल्या पक्षाचे बोर्ड काढून टाका.

**दिनेश नलावडे :-**

केंद्रीय मंत्री साहेब आले कुठे आणि ती लाईट कुठल्या ठिकाणी लावली आहे. आमचा देखील मान आहे की, आपल्या शहरात केंद्रीय मंत्री येतात ते. ह्याचा बरोबर खुलासा झालेला नाही. केंद्रीय मंत्री आले म्हणून ती लाईट तिथे लागली आहे का वेगळ्याच प्रकारासाठी लागली आहे. आणि ते केंद्रीय मंत्री दिवसाढवळ्या आले होते. सभागृहाला याची माहिती देण्यांत आली होती का. केंद्रीय मंत्री येणार आहेत. सभापती साहेब आपण ह्या विषयावर काय निर्णय देता.

**मिलन म्हात्रे :-**

लाईटच्या विषयाबाबत बोलतोय. तीन महिन्यापासून बोलतोय असे काही पब्लिक जागा आहे. तिथे लाईटचे खांबे लावण्यांत यावे असे सांगितले आहे. असे जे गरजेचे प्रस्ताव आहे ते पाठी ठेवून ज्या ठिकाणी लोक जात नाही तिथे लाईटचे खांबे लावण्यांत आले आहे. कुठे ३५ कुठे १० लाईट हा सर्व प्रकार चालला आहे. टेंब्याचा प्रकार आहे तिथे लाईट रात्रंदिवस लागते. दोन तीन वर्षापासून हॉस्पीटलचे बोलतोय तो विषय आता येतोय.

**धनराज अग्रवाल :-**

चौपाटी पब्लिक प्लेस आहे. तिथे लाईट लावणे हे गरजेचे आहे. मा. राम नाईक साहेबांनी गॅमन इंडिया कडून एक करोड रुपये चौपाटी करिता देणार असे सांगितले आहे. रोहिदास पाटलांनी जाणून बुजून त्यांना चौपाटीवर घेऊन गेले आणि सर्वांसमोर त्यांनी घोषणा केली रक्कम देण्याची व त्यांनी सांगितले प्लॅन तुम्ही आम्हाला बनवून दाखवा आम्ही तुम्हाला निधि उपलबध करुन देतो. ह्याच्यात नगरपालिकेचे कोणते नुकसान होणार आहे?

**शिवप्रकाश भुदेका :-**

सात मिटींग झाली तरी ह्या विषयावर अजून मतभेद होत आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मी देखील त्या ठिकाणी काम केले आहे. त्या चौपाटीच्या ठिकाणी बॅंच बसविले होते आणि आपल्या लोकांनी ते बॅंच काढून टाकले. गॅमन इंडिया कडून आपल्याला निधी उपलबध करुन देणार आहे. तर गॅमन इंडियाला आपण त्यांच्या जागी जे.सी.बी. लावून कचऱ्याच्या ढिगाचा भराव करुन दिला आहे. चौपाटी ही सार्वजनिक जागा आहे. कलेक्टरची जागा आहे. तो जो बोर्ड तिथे लावला आहे तो काढून टाका अन्यथा आम्ही देखील आमच्या पक्षाचा बोर्ड तेथे जाऊन लावू.

**तुळशीदास म्हात्रे :-**

ज्यांनी तिथे चौपाटी निर्माण केली त्याचे नांव देखील घेतले जात नाही अशी परिस्थिती आहे.

**दिनेश नलावडे :-**

हे काम नगरपालिकेचे आहे कोणत्या पक्षाचे नाही. महानगरपालिकेच्या मार्फत तिथे काम चालू करुन सर्व पक्षीस बोर्ड लागले पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

गॅमन इंडियाने माती टाकली आहे ह्या येथे आपले एक मंच बांधले आहे. तिथे मातीचा भराव नगरपालिकेने केला होता त्यांनी जो मातीचा भराव टाकला आहे. ते त्यांनी आपल्यावर काय मेहेरबानी केलेली नाही.

**मा. सभापती :-**

एखाद्या पक्षाच्या नावाचा उल्लेख विकास कामासाठी होऊ शकत नाही. आम्ही सांगितले गॅमन इंडियाला आणि त्यांनी काम केले ते बोलणे बरोबर नाही. मिरा भाईंदर नगरपालिका असताना संपूर्ण चौपाटी आम्ही तयार केली. गणपती विसर्जन कोणत्या पद्धतीने झाले पाहिजे. त्या करिता चौपाटी निर्माण करण्यांत आली. पण गॅमन इंडियाने अतिक्रमण केले आणि त्यांनी चौपाटी ताब्यात घेतली. नगरपालिकेने लाखोने खर्च केले होते तो खर्च नगरपालिकेचा वाया गेला. शहरातील कचरा, माती जे.सी.बी.ने आणून तिथे भराव केला आणि ती चौपाटी दिसून आली आणि त्या ठिकाणी गॅमन इंडियाचे मटेरियल उभे केले. तिथे जे मटेरियमल पडले आहे त्याची विल्हेवाट आपण लावली पाहिजे आणि आमच्या पक्षांनी जावून बधितले आणि ता ढिग बाजूला केला. मिरा भाईंदर महानगरपालिकेने एस. एन. कॉलेजच्या जागेमध्ये चतुर्थ श्रेणीकरीता संकुल (निवासस्थान) मातीचा भराव करुन फ्लींथ तयार केली होती. त्याच्याकरीता लाखो रुपये खर्च केले होते. ती जागा कॉलेजला देण्याकरीता त्या ठिकाणी बुलडोझर फिरवला. आमचे सन्मा. सदस्य लिओ कोलासो त्यावेळी सभापती होते. सदरची जाग

कलेक्टर लँड होती. त्याची किंमत साडेतीन कोटींच्या वर असतांना आम्ही त्यांना नाहरकत पत्र देऊ केले. जागा देतांना प्रायव्हेट ट्रस्ट आहे हे ही बघितले नाही व आम्ही मोठेपणा का घेतला तर शहरासाठी. शहराला कॉलेज मिळाल्याने शहराची प्रगती होते आणि त्यासाठी आपण त्यांना जागा दिली. चौपाटीच्या कामाला प्रशासनाच्या माध्यमातून भराव केला. त्या चौपाटीकरीता ८५ लाख रुपये तरतुद आहे. आणि हा फंड चौपाटीसाठी लावायचा का नाही लावायचा. प्रशासन योग्य उत्तर देण्यासाठी कुचकामी ठरले आहे. बी.जे.पी. कडून अशी धारणा निर्माण करण्यांत आलेली आहे की, खर्च हा आम्ही करतोय चौपाटीसाठी. त्याच्यामुळे हा प्रश्न व संभ्रम निर्माण झाला. आर.एम.पी.पार्क, जेसल पार्क येथे लाईट लावतो. तर पाच-पंचवीस लाख रुपये खर्च तुम्ही ह्या चौपाटीवर करा. भाईंदर पश्चिमेला मोठी चौपाटीची जागा महानगरपालिकेने हस्तांतरीत करुन घेतली आहे. केंद्रीय मंत्री राम नाईक ह्यांनी एक करोड रुपये चौपाटी विकसित करायला देणार म्हणून सांगितले आहे. तर ती रक्कम भाईंदर पूर्वेला दिली पाहिजे असे काही आहे का? तुम्ही ते एक करोड रुपये भाईंदर पश्चिमेला खर्च करा. जागा ताब्यात घेण्याचा प्रस्ताव अजून आलेला नाही. अजून भाईंदर पूर्वेची जागा ताब्यात नाही आपण आता प्रस्ताव पाठविणार आहोत. पण भाईंदर पश्चिमेची जागा ही आपल्या ताब्यात आलेली आहे. तिथे बोर्ड लागले आहे असे करुन आपण राजकारण आणू नये. सन्मा. सदस्यांना आपण विश्वासात घेवुन काम करु. शहराचे विकासकाम हे झाले पाहिजे. उदात्त धोरण बी.जे.पी. म्हणून घेत असाल तर शहराचा विकास हा होऊ शकता. महासभेला विषय आलेला आहे. राम नाईक साहेबांना तुम्ही पत्र द्या आणि सांगा तुम्ही जो फंड देत आहात ता फंड भाईंदर पश्चिमेच्या चौपाटीला उपलब्ध करुन द्यावा. आपण ह्या ठिकाणी जो नवीन पायंडा पाडत आहात तो बरोबर नाही. एखाद्या पक्षाच्या नावाने कोणतेही काम करायचे आणि प्रत्येक ठिकाणी बोर्ड लावायचे ते योग्य नाही. म्हणून मी प्रशासनाला विनंती करतो सदरच्य ठिकाणी पाच-पंचवीस लाख रुपये आपल्या फंडातून भाईंदर पूर्वेच्या चौपाटीवर खर्च होत असेल तर खर्च करा आणि काम चालू करा. भाईंदर पश्चिमेच्या चौपाटीचा प्रोजेक्ट आहे त्याच्यासाठी गॅमन इंडियाकडून मटेरियल न घेता बि.जे.पी. चा फंड घेऊन काम पूर्ण करा. आम्ही तुमच्या बरोबर आहोत. ह्यात कोणत्याही पक्षाची बाब येता कामा नये. आपल्या पक्षाचे झेंडे लागतात, पक्षाचे बोर्ड लागातात पण त्या ठिकाणी शहराचे मटेरियल गेलेले आहे. गॅमन इंडिया आपल्यावर मेहेरबानी करत नाही. त्यां आपण आपले आर.ओ.बी.चे काम दिले आहे. महेंद्रसिंग चौहाण यांनीही चौपाटीचा विकास व्हावा याकरिता प्रयत्न केले आहे तरी आम्ही असे कधीही बोलून दाखविले नाही. आम्ही नेहमी तुमच्या बरोबर आहोत. तुम्ही जर खासदार फंडातून फंड देत असाल तर द्या. कारण भाईंदर पश्चिमेची ती जागा आपल्या ताब्यात आहे. भाईंदर पूर्वेची जागा आपल्या ताब्यातून गेली असे नाही. राम नाईक साहेबांना तुम्ही पत्र द्या, हा जो प्रस्ताव येथ आम्ही तुमच्या समोर मांडला आहे तो चांगला प्रस्ताव आहे आणि त्याकरिता आम्ही बी.जे.पी. चे आभार मानू. सदरच्या चौपाटीवर असा खर्च करता येतो व तो आपण करु शकतो आणि भाईंदर पूर्वेच्या चौपाटीवर पाच-पचवीस लाख रुपये चौपाटी विकसित करण्याकरीता प्रशासनाने खर्च करावे आणि ते काम मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत चालू करा. हा जो एक कोटीचा प्रस्ताव आहे तो आपण भाईंदर पश्चिमेच्या चौपाटीसाठी त्याचा वापर करावा. सन्मा. राम नाईक व बी.जे.पी.च्या कार्यकर्त्यांना आम्ही असे काम केले तर ह्याबद्दल धन्यवाद देऊ. भाईंदर पश्चिमेच्या चौपाटी करिता एस्टीमेट, प्लॅन तयार आहे. असे काम केले तर आम्ही तुमचा सत्कार करायला तयार आहे.

**<u>मा. उपायुक्त</u> :-**

प्रशासन उत्तर देण्यासाठी कुचकामी ठरले आहे असे आता सभापती साहेब बोलले. पण तसे नाही. कमीत कमी तीन ते चार वर्ष कचरा टाकत होतो आणि भराव हा महापालिकेने केला आहे. आणि हा भराव जवळ जवळ तीन महिने जी.सी.बी. आमचा खर्च होत होता. हे काम कुठल्या पार्टीने केलेले नाही आणि त्या ठिकाणी बोर्ड लावणे हे संयुक्तिक नाही. आता पर्यंत चौपाटीवर महापालिकेचा खर्च झाला आहे व गॅमन इंडियाने जे वेस्टेज आहे ते त्यांनी टाकलेले आहे.

**<u>ज्योत्स्ना हसनाळे</u> :-**

उपायुक्त साहेब तेथून पक्षाचे बोर्ड काढणार का?

**<u>मा. सभापती</u> :-**

सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही पक्षाचे बोर्ड लावण्यांत येऊ नये.

**<u>प्रकरण क्र. ३९</u> :-**

भाईंदर पूर्व चौपाटी विकसित करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**<u>ठराव क्र.          </u> :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर पूर्व येथे चौपाटीचे आरक्षण असून सदरची जागा मा.जिल्हाधिकारी यांच्या मालकीची आहे. सदर चौपाटीची जागा ताब्यात घेणेबाबत मा.जिल्हाधिकारी

यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. सदर चौपाटी विकसित करणे बाबत मा.श्री.राम नाईक यांनी निधी उपलब्ध करुन देणेबाबत आश्वासन दिलेले आहे. सदर चौपाटी विकसित करणे कामी रु.१.०० कोटी खर्च अपेक्षित असून सदर निधी उपलब्ध झाल्यास महानगरपालिकेच्या निधीची बचत होणार आहे. असा प्रशासनाचा प्रस्ताव आहे. परंतु भाईंदर पूर्व चौपाटीची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात नसल्याने व भाईंदर (प) येथील चौपाटीची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याने सदर भाईंदर पश्चिम चौपाटी विकसित करण्याकरिता रुपये १ कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबत मा.श्री.राम नाईक केंद्रीय मंत्री महोदय यांना विनंती करण्यात यावी असा ठराव पारीत करण्यात येत आहे.

**सुचक :- महेंद्रसिंग चौहाण.** **अनुमोदन :- लिओ कोलासो.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

विषयपत्रिकवरील पुढील विषय पुढच्या सभेत घेण्यांत यावे. तरी सदरची सभा तहकूब करण्यांत येत आहे. सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानुन आजची सभा येथे संपल्याचे जाहिर करता आहे.

**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रभारी सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**